मा. कोर्ट को.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सातारा **P.S.**(ठाणे): सातारा शहर **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0428 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 25/06/2019 22:25 बजे

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 (अ) |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार — **Date From** (दिनांक पासून): 25/06/2019

**Time Period** (कालावधी): पहर 4 — **Date To** ( दिनांक पर्यंत): 25/06/2019

**Time From** (वेळेपासून): 11:10 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 11:10 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 25/06/2019 **Time** (वेळ): 21:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद 066 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 25/06/2019 22:25 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): प्रांत अधिकारी सातारा,यांचे कार्यालयाचे कमाणीजवळ, सातारा,सातारा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संभाजी बबनराव सावंत

(b) **Father's Name** (वडील का नाव) : बबनराव

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1969 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| **S.No.**(अ. | **Id Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **Id Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ. क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लिंब,सातारा,सातारा तालुका,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लिंब,सातारा,सातारा तालुका,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): शेतकरी

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9226755266

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनायक लक्ष्मण गायकवाड | | वडील का नाम : लक्ष्मण | 1. आदित्य नगरी, बी 6, ,खेड,सातारा, सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ. क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

खबरी जबाब दि. 25/6/2019 संभाजी बबनराव सावंत वय 50वर्ष व्यवसाय शेती शिक्षण 10वी रा.लिंब ता.जि.सातारा मो.नं. 9226755266 समक्ष हजर राहुन देतो खबरी जबाब की, मी माझ्या कुटुंबियासह लिंब येथे राहणेस आहे. माझे वडील व माझे चुलते श्री.मारुती रामा सावंत यांचे नांवे मौजे लिंब या ठिकाणी 136 गुंठे शेतजमीन असुन त्या जमीनीचा जुना गट नं.1055 असा असुन नवीन गट नंबर 956 ब /2 व 956 ब/9 असा आहे. सदरची जमीन ही पुनर्वसन यांचे नावे असुन त्याचा प्रत्यक्षात कब्जा हा आमचे मालकीचा आहे. सदर जमिनीचे कब्जा संदर्भात मा.उपविभागीय अधिकारी सातारा यांचे कार्यालयात वहिवाट अडथळा याबद्दल श्री मारुती हरी चोरट तर्फे संगिता राजेंद्र चोरट रा.लिंब यांनी कब्जासाठी दावा दाखल केला होता. तसेच आमचे वडिलांनी व चुलत्यांनी सदर जमीनीबाबत हायकोर्ट दावे दाखल केले आहेत. मा.उपविभागीय अधिकारी, सातारा उपविभाग सातारा यांनी सदर प्रकरणाचा दि.14/5/2019 रोजी निकाल दिला आहे. त्या निकालाची सत्यप्रत मला मिलणेसाठी मी.मा.उपविभागीय अधिकारी सातारा यांचे कार्यालयात दि.20/6/2019रोजी अर्ज दिला व त्याची पोच घेतली. त्यावेळी त्या ठिकाणी हजर असलेला एक इसम माझ्या जवळ येवुन मला मी उपविभागीय अधिकारी सातारा यांचे गाडीवरील गायकवाड ड्रायव्हर आहे, मला तुमचं प्रकरण माहीत आहे. असे म्हणुन त्यांनी माझ्याकडे माझ्या कामाची विचारपुस करुन माझा मोबाईल नंबर घेतला व , मी तुमचे प्रकरणाचे निकालाची नक्कल तुम्हांला मिळवुन देतो, तुम्ही मला एक हजार रुपये आणुन दया असे म्हणुन एक हजार रुपयांची मागणी केली. त्याबाबत मी दिनांक 24/6/2019 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सातारा येथे हजर राहुन पोलीस निरीक्षक श्रीमती मुल्ला यांना लाच मागणी तक्रार सांगितली. त्यानंतर त्यांनी एसीबी कार्यालय सातारा येथे 1) शिवाजी बाबुराव सुर्यवंशी, कनिष्ठ सहायक, जिल्हा परिषद, सातारा 2) नारायण बबनराव पवार, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद सातारा सातारा यांची पंचसेवा उपलब्ध करुन त्यांची तसेच सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी पो.नि.मुल्ला मॅडम यांचेकडे माझा संगणकावर टाईप केलेला तक्रारी अर्ज व त्यासोबत नक्कला मिळणेकरीता दिलेल्या अर्जाची झेरक्स प्रत दिली. पो.नि.मुल्ला मॅडम यांनी मी त्यांचेकडे दिलेली तक्रारी अर्ज व सोबतची झेरक्स प्रत वाचुन पाहुन दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. त्यानंतर माझ्या तक्रारी प्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी सातारा यांचे गाडीवरील गायकवाड ड्रायव्हर यांनी माझ्याकडे लाच मागणी केली अगर केस? याची पडताळणी करण्यासाठी पंच नं.1 म्हणुन सुर्यवंशी व पंच नं. 2 म्हणुन सुर्यवंशी व पंच नं.2 म्हणुन पवार यांनी काम करण्याचे मुल्ला मॅडम यांनी ठरवुन पंचानी अर्जाचे वाचन केल्यावर त्या अर्जावर तसेच सोबत नकला मिळणेसाठी केलेल्या अर्जाचे पोच झेरक्स प्रतीवर पो.नि.मुल्ला मॅडम व पंचानी सह्या केल्या. त्यानंतर मला व पंच नं.1 सुर्यवंशी यांना पडताळणी कामी सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह पंच 1 यांचेकडील दुचाकी वाहनावरुन उपविभागीय अधिकारी सातारा यांचे शासकीय वाहनावरील गायकवाड ड्रायव्हर यांची भेट घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय सातारा या ठिकाणी पाठवुन पडताळणी केली असता , त्यामध्ये उपविभागीय अधिकारी यांचे गाडीवरील ड्रायव्हर हे उपविभागीय अधिकारी सातारा यांचे कार्यालयाचे ठिकाणी नसल्याने त्यांना मी फोन

केला असता त्यांनी मला जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे या असे सांगितले त्यानंतर मी पंच नं. 1 असे त्यांचेकडील दुचाकी वाहनावरुन जिल्हाधिकारी कार्यालय येथे गेलो. तेथे गायकवाड ड्रायव्हर व माझी समक्ष भेट झाली. त्याचेत व माझेत कामाबाबत चर्चा झाली. त्यामध्ये उपविभागीय अधिकारी सातारा यांनी आमचे पुनर्वसन जमिनीचे कब्जेवहिवाटीचे दाव्याबाबत दिलेल्या निकालाची सत्यप्रत मिळवुन देण्यासाठी गायकवाड ड्रायव्हर यांनी एक हजार रुपये दया असे म्हणुन माझेकडे लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम फोन करुन जेथे सांगितले त्याठिकाणी स्विकारण्याची सहमती दर्शवली असल्याची केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये पोनि.मुल्ला व दोन्ही पंचांनी खात्री झाली. त्यानंतर पो.नि.मुल्ला मॅडम यांचे सुचनेनुसार मी 1000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका कोऱ्या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई एसीबी कार्यालायातील कक्षामध्ये केली. सापळा कारवाईसंबंधाने पोनि मुल्ला मॅडम यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक असा सर्व सुचना दिल्या. त्यानंतर पोनि मुल्ला मॅडम यांचे सुचनेनुसार मी ड्रायव्हर गायकवाड यांना स्पिकर ऑन करुन फोन केला असता त्यांनी कलेक्टर ऑफीसला या असे सांगितले त्यानंतर पोनि मुल्ला मॅडम यांनी व्हाईस रेकर्डरमध्ये माझे व पंच नंबर 1 यांचे निवेदन ध्वनिमुद्रीत करुन व्हाईस रेकर्डर माझ्या गळ्यामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवुन उपविभागीय अधिकारी सातारा यांचे ड्रायव्हर श्री गायकवाड यांची भेट घेण्याकामी पंच नं. 1 सुर्यवंशी यांचे दुचाकी वाहनावरुन जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे रवाना केले. पो. नि.मुल्ला मॅडम व सापळा पथक असे आमचे पाठोपाठ काही अंतर ठेवुन शासकीय वाहनाने आले. त्यानंतर शासकीय वाहन काही अंतरावर थांबवुन पोनि.मुल्ला मॅडम पंच नंबर 2 व सापळा पथक असे वाहनातुन खाली उतरुन जिल्हाधिकारी कार्यालय साताराचे इमारतीचे अवतीभवती कोणास काही संशय येणार नाही अशा रितीने थांबुन राहिले. त्यावेळी माझी व श्री गायकवाड यांची भेट होवुन त्यांनी मला त्यांचेकडील मोटार सायकलवरुन पंचायत समिती जवळील बढीया पेट्रोलपंपाचे जवळ असलेल्या रिक्षास्टपजवळ नेले त्यावेळी पंच नं. 1 हे त्यांचेकडील दुचाकीवरुन आमचे पाठोपाठ रिक्षा स्टपजवळ आले. तसेच पोनि मुल्ला, पंच नं. 2 व सापळा पथक असे शासकीय वाहनाने येवुन काही अंतरावर येवुन थांबले. तेव्हा गायकवाड व माझ्यामध्ये पैशाबाबत चर्चा होवुन माझ्याकडे पाचशेच्या दोन नोटा असल्याचे व सुट्टे पैसे नसल्याने श्री गायकवाड यांनी तुम्ही पैसे घेवुन उद्या अकरा वाजता तहसिल कार्यालयात या असे म्हणुन पैसे न स्विकारलेने व मला दि.25/6/2019 रोजी पैसे घेवुन बोलाविल्याने मी व पंच नं.1 असे एसीबी कार्यालय सातारा येथे परत आलो. त्यानुसार पोनि मुल्ला मॅडम यांनी दिनांक 25/6/2019 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरवुन त्यांनी मला , दोन्ही पंचांना व सापळा पथकास झाले कारवाईबाबत गोपनियता राखण्याच्या व दि. 25/6/2019 रोजी सकाळी 10.00 वा एसीबी कार्यालय सातारा येथे हजर राहण्याच्या सुचना देवुन मला घरी जाणेस सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 25/6/2019 रोजी सकाळी 10.00 वा एसीबी कार्यालय सातारा येथे हजर झालो. कार्यालयात पोनि मुल्ला मॅडम, दोन्ही पंच व सापळा पथक हजर होते. त्यानंतर मुल्ला मॅडम यांचे सुचनेनुसार मी 1000/- रुपये हजर केले त्यांनी नोटांचे क्रमांक एका कोऱ्या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई त्यांचे कक्षात केली. त्यानंतर सापळा कारवाई संबंधाने मुल्ला मॅडम यांनी मुल्ला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक अशा सर्व सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकर्डरमद्ये माझे व पंच नंबर 1 यांचे निवेदन ध्वनिमुद्रीत करुन व्हाईस रेकर्डर माझ्या गळ्यामध्ये लेसच्या सहायाने अडकवुन उपविभागीय अधिकारी सातारा विभाग यांचे शासकीय वाहनावरील ड्रायव्हर श्री गायकवाड यांची भेट घेण्याकामी पंच नं.1 यांचेकडील दुचाकी वाहनावरुन तहसिल कार्यालय सातारा येथे 10.48 वा चे सुमारास रवाना केले. पोनि मुल्ला मॅडम व पंच नं.2 सापळा पथक असे आमचे पाठोपाठ काही अंतर ठेवुन खाजगी वाहनाने आले. त्यानंतर खाजगी वाहन काही अंतरावर थांबवुन पोनि मुल्ला, पंच नंबर 2 व सापळा पथक असे वाहनातुन खाली उतरुन उपविभागीय अधिकारी सातारा व तहसिलदार सातारा यांचे कार्यालयाचे इमारतीचे अवतीभोवती कोणास काही संशय येणार नाही अशा रितीने थांबुन राहिले. मी व पंच नं.1 असे त्यांचेकडील दुचाकी वाहनाने तहसिल कार्यालय साताराचे समोर आवरात जावुन दुचाकी वाहन उभे केले. तेथे तहसिल कार्यालयाचे समोर माझी व श्री गायकवाड यांची भेट झाली. नंतर श्री गायकवाड हे मला उपविभागीय अधिकारी तथा प्रांत अधिकारी कार्यालय असे लिहलेल्या कामानीपर्यंत घेवुन गेले. तेथे त्यांनी मला सही शिक्क्यासह असणाऱ्या नकला देवुन पैशाची मागणी केली तेव्हा मी माझ्या शर्टच्या डावे बाजुचे खिशात अंथ्रासीन पवाडर लावुन ठेवलेली एक हजार रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन श्री. गायकवाड यांच्या समोर धरली असता त्यांनी ती त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन एक हजरा रुपये असल्याची खात्री केली त्यावेळी मी त्यांना काय कामी जास्त असे म्हणालो असता त्यांनी मला त्यातील शंभर रुपयाची एक नोट काढुन नोट काढुन ती मला परत दिली. त्यानंतर मी डावे हाताने डोक्यावरील टोपी काढुन लाच रक्कम स्विकारल्याचा 11.12 वाजता पुर्वनियोजित इशारा केला असता आपण सर्वजण माझ्या जवळ आलात. त्यावेळी पोनि मुल्ला मॅडम यांनी कर्मचाऱ्याकरवी माझ्याकडील व्हाईस रेकर्डर काढुन घेवुन तो बंद केला व मला बाजुला थांबणेस सांगितले. पोनि मुल्ला मॅडम व सापळा पथक असे गायकवाड ड्रायव्हर यांना घेवुन उपविभागीय अधिकारी सातारा यांचे कार्यालयात गेले. त्यानंतर काही वेळाने पोनि मुल्ला मॅडम यांनी मला उपविभागीय अधिकारी कार्यालयात बोलावुन माझी तपासणी केली असता माझ्या शर्टच्या छातीवरील डावे बाजुचे खिशात आतील भागास व कडांस तसेच माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यांना व तळहातास अंथ्रासीन पावडर लागल्याची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोनि मुल्ला मॅडम यांनी मला एसीबी कार्यालय सातारा येथे बाहेर थांबुन राहण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी एसीबी कार्यालय सातारा येथे बाहेर थांबुन राहिलो. त्यानंतर पोनि मुल्ला , दोन्ही पंच व सापळा पथक असे सर्वजण श्री गायकवाड यांना सोबत घेवुन एसीबी कार्यालय सातारा येथे आल्या व पोनि मुल्ला मॅडम यांनी पुढील कार्यवाही सुरु केली. त्यानंतर काही वेळाने पोनि मुल्ला यांनी मला कार्यालयात बोलवुन घेवुन त्यांच्याकडील कर्मचारी यांचेकरवी माझी अंगझडती घेतली. त्यावेळी माझ्या शर्टच्या डावे छातीवरील खिशातील लाच रक्कमेबाबत पोनि मुल्ला यांनी विचारले असता ती लाच रक्कम मी श्री गायकवाड यांच्या मागणीप्रमाणे त्यांना दिली असुन त्यावेळी मी त्यांना काय कमी जास्त असे म्हणालो असता त्यांनी चालतय शंबर रुपये कमी दया असे म्हणुन त्या रक्कमेतील शंभर रुपयाची एक नोट मला श्री गायकवाड यांनी परत दिल्याची सांगुन नमुदची नोट हजर केली. ती नोट पोनि मुल्ला मॅडम यांनी त्यांचेकडे ठेवुन घेवुन मला दुसरी शंभर रुपयाची नोट बदलुन दिली. त्यावेळी मला पोनि मुल्ला मॅडम यांचेकडुन नमुद ड्रायव्हर यांचे संपुर्ण नांव विनायक लक्ष्मण गायकवाड वय 52वर्ष रा.आदित्य नगरी, बी 6 खेड सातारा मुळ रा.वळसे ता.जि.सातारा असे असुन तो उपविभागीय अधिकारी सातारा यांचे शासकीय वाहनावरील खाजगी चालक असल्याचे समजले. त्यानंतर मला पुन्हा कार्यालयाच्या बाहेर थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी बाहेर थांबुन राहिलो. त्यानंतर काहीवेळाने पुन्हा मला कार्यालयात बोलावुन घेवुन संभाषणाचे स्क्रिप्टमधील नामोल्लेख माझ्या व पंच नं.1 यांच्या सांगण्यानुसार केला. त्यानंतर मला पोनि मुल्ला यांनी घडलेल्या घटनेबाबत हकीकत विचारली असता मी वरील प्रमाणे हकीकत सांगितली. तसा सविस्तर सापाळा पंचनामा एसीबी कार्यालय सातारा येथे टंकलिखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे. तरी श्री विनायक लक्ष्मण गायकवाड वय 52वर्ष रा.आदित्य नगरी, बी 6, खेड सातारा मुळ रा.वळसे ता.जि.सातारा, उपविभागीय अधिकारी सातारा यांचे शासकीय वाहनावरील खाजगी ड्रायव्हर यांनी माझ्याकडे माझ्या पुनर्वसन जमिनीचे कब्जे वहिवाटीचे दाव्याबाबत उपविभागीय अधिकारी सातारा यांनी दिलेल्या निकालाची सत्यप्रत मिळवुन देण्याकरीत

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** pradipkumar dyneshwar jadhav(I (Inspector)) / pi **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14.**Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाम):** pradipkumar dyneshwar jadh
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pi

(म पो ना ब न 1732)
पो. स्टे. ऑफिसर
सातारा शहर पो. स्टे.

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**